# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
## Date: 04 October 2023
## Time 01.00 to 01.05 PM
## Language Marathi
## आकाशवाणी औरंगाबाद
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक : ०४ ऑक्टोबर २०२३ दुपारी १.०० वा.

****

चीन मध्ये सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं आज एक सुवर्ण आणि तीन कांस्य पदकांची कमाई केली.

तीरंदाजीमध्ये मिश्र दुहेरी प्रकारात ओजस देवतळे आणि ज्योती सुरेखा वेन्नम या जोडीनं सुवर्णपदक पटकावलं. त्यांनी दक्षिण कोरिया संघाचा १५९- १५८ गुणांनी पराभव केला. 35 किलोमीटर चालण्याच्या मिश्र प्रकारच्या स्पर्धेत आज राम बाबू आणि मंजू राणी यांनी कांस्य पदक जिंकलं. स्क्वॅश मध्ये मिश्र दुहेरी प्रकारात अनाहत सिंह आणि अभय सिंह यांनी कांस्य पदक मिळवलं, तर मुष्टीयुद्धातही परवीन हुड्डा हिनं कांस्य पदक जिंकलं. या सर्व खेळाडुंचं पंतप्रधान नरेंद्र मोदी, क्रिडा मंत्री अनुराग ठाकुर आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभिनंदन केलं आहे.

या स्पर्धेत भारतानं आतापर्यंत ७३ पदकं जिंकून पदकतालिकेत चौथं स्थान कायम ठेवलं आहे.

दरम्यान, या स्पर्धेत आज पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत नीरज चोप्रा खेळणार आहे. याशिवाय बॅडमिंटन, मुष्टीयुद्ध, हॉकीमध्येही भारताचे सामने होणार आहेत.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीची द्वैमासिक आढावा बैठक आज मुंबईत सुरू झाली. गव्हर्नर शक्तीकांत दास येत्या शुक्रवारी चलनविषयक धोरण जाहीर करतील. मागच्या बैठकीत या समितीनं रेपो दर सहा पूर्णांक पाच टक्के इतका कायम ठेवला होता.

****

सिक्कीम मध्ये ढगफुटीमुळे लाचेन खोर्यातील तीस्ता नदीला आलेल्या पुरात भारतीय लष्कराचे २३ सैनिक बेपत्ता झाले आहेत. काही वाहनंही गाळाखाली दबली गेली असून, या परिसरात शोधमोहिम सुरु असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषण खंड २३ आणि इतर तीन ग्रंथांचं प्रकाशन काल मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. डॉ आंबेडकरांच्या लेखनाचे ४, १२, १५, १७ आणि १८ तसंच जातीव्यवस्थेचं निर्मूलन या ग्रंथाच्या नव्या आवृत्तीचं प्रकाशनही यावेळी करण्यात आलं.

****

राज्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या सर्वदूर पावसामुळे खरीप पिकांना दिलासा मिळाला असून, रब्बी हंगामातील पिकांच्या पेरण्यांसाठीही आशादायक चित्र निर्माण झालं आहे. रब्बीमध्ये प्रामुख्याने ज्वारी आणि गव्हाच्या पिकक्षेत्रात वाढ अपेक्षित असून, हरभऱ्याचा पेरा नवा उच्चांक गाठण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या वर्षीच्या रब्बी हंगामात, कृषी आयुक्तालयाने सुमारे ६२ लाख ७७ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरण्यांचे नियोजन केल्याचं सांगण्यात आलं आहे.

****

राज्यात आरक्षणावरुन वादंग पेटलेलं असताना, समाजा समाजात क्लेश निर्माण होत असताना राज्य सरकारची भूमिका बेजबादारीची असल्याचा आरोप, डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंचाचे अध्यक्ष डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांनी केला आहे. विकास मंचच्या वतीने काल बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. कंत्राटीकरण तसंच कथित खाजगीकरणाच्या विरोधात हा मोर्चा काढण्यात आला होता.

****

आगामी पाच नोव्हेंबरला बीड जिल्ह्यातल्या १८६ ग्रामपंचायतींमध्ये मतदान होणार आहे. जिल्ह्यातल्या अनेक ग्रामपंचायतींची मुदत मागच्या सात आठ महिन्यांपासून संपली आहे. या मतदानाची सात नोव्हेंबरला मोजणी होणार आहे.

****

दक्षिण मध्य रेल्वेनं काही रेल्वे गाड्यांचं नवीन वेळापत्रक जारी केलं आहे. यामध्ये मुदखेड, नांदेड, पूर्णा, परभणी, सेलू, परतूर, जालना, औरंगाबाद, नगरसोल, वसमत या स्थानकांवर काही गाड्यांचे वेळेत बदल होणार आहे. हे वेळापत्रक

आजपासून लागू झालं असून, प्रवाशांनी याबाबत रेल्वेच्या एक तीन नऊ या क्रमांकावर, तसंच राष्ट्रीय रेल्वे चौकशी यंत्रणा – एन टी ई एस किंवा रेल्वे स्थानकावरील चौकशी कक्षात विचारणा करावी, असं दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क कार्यालयानं कळवलं आहे.

****

दरम्यान, दक्षिण मध्य रेल्वेनं काही विशेष गाड्यांना मुदतवाढ दिली आहे. यामध्ये तिरूपती जालना गाडीला २८ नोव्हेंबरपर्यंत, जालना छपरा गाडीला २९ नोव्हेंबरपर्यंत, छपरा जालना गाडीला एक डिसेंबरपर्यंत तर जालना तिरूपती या रेल्वे गाडीला तीन डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

****

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनाच्या वतीनं आयोजित डॉ. सतीश साळुंके लिखित आणि दिग्दर्शित 'गाथा मुक्तीसंग्रामाची' या नाटकाला मराठवाड्याच्या सर्व ७६ तालुक्यातून अभूतपूर्व प्रतिसाद मिळत असून, बीड जिल्ह्यात या नाटकाला प्रेक्षक मोठी गर्दी करत आहेत. अधिकाधिक सुजाण नागरिक, शिक्षक, विद्यार्थ्यांनी या नाटकाचा लाभ घेऊन मराठवाड्याच्या मुक्तिसंग्रामाचा इतिहास समजून घ्यावा, असं आवाहन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं विभागीय स्तरावरील महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी येत्या नऊ ऑक्टोबर रोजी लोकशाही दिनाचं आयोजन करण्यात आलं आहे. विभागीय आयुक्त कार्यालयात सकाळी ११ वाजता याअंतर्गत दाखल प्रकरणांची सुनावणी होणार आहे.

****